◆ ऑक्टोबर १९९९
◆ वर्ष तिसरे
◆ अंक दहावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

## – अनुक्रमणिका –

| | |
|---|---|
| **संपादकीय** | २ |
| **पुस्तक परिचय** | ६ |
| **प्रवाह** | २२ |
| **विज्ञान-विशेष** | २५ |
| **व्यवसायविषयक कायदे** | ३० |
| **फुले आणि काटे** | ३२ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ३६ |

□ संपादक
सुनील मेहता

□ कार्यकारी संपादक
शंकर सारडा

□ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर

□ अंकाची किंमत १० रु.
वार्षिक वर्गणी ८० रु.

□ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी

□ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

***संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,*** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०.
***मांडणी-अक्षरजुळणी : मेहता पब्लिशिंग हाऊस,*** १२१६ सदाशिव पेठ, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## जनस्थान पुरस्काराचे मानकरी

नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या यंदाच्या जनस्थान पुरस्काराचे मानकरी म्हणून विख्यात कथाकार व्यंकटेश माडगूळकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली, त्या वेळी बहुतेकांची प्रतिक्रिया अशीच होती की हा सन्मान त्यांना आधीच मिळायला हवा होता. माडगूळकरांना नवकथेच्या प्रवर्तकांमध्ये मानाचे स्थान आहे. आणि ग्रामीण जीवनाकडे आत्मीयतेने पण तटस्थतेने पाहण्याचे एक अभिजात सुसंस्कृत साक्षीदाराचे भान त्यांच्या सर्वच लेखनात दिसते. अगदी आरंभापासून हे भान दिसते आणि ते आजपर्यंत टिकून राहिलेले आहे. हे विशेष! पावसापाण्यावर अवलंबून असणाऱ्या बेभरवशाच्या शेतीत धडपडणारा, मागासलेला, अडाणी, अविकसित, साधाभोळा, शापित, दरिद्री, दुष्काळी, सतत अर्धपोटी राहणारा आणि शहरी आधुनिक सुखसुविधांपासून शतयोजने दूर असलेला समाज असा एक तुच्छतावादी दृष्टिकोन किंवा खेड्यामध्ये निसर्गाचे निखळ सौंदर्य, शांतता, अकृत्रिम, प्रामाणिक, अतिथ्यशील आणि माणुसकीच्या आदिम संस्कारांची जपणूक करणारा समाज असा काहीसा रोमँटिक दृष्टिकोन यातून ग्रामीण जीवनाकडे पाहण्याची सर्वसाधारण आपली सवय असते. व्यंकटेश माडगूळकरांनी या दोन्ही टोकदार भूमिका बाजूला ठेवून, भाबडी आत्मीयता आणि कठोर तुच्छता टाळून, माणदेशातील माणसांचे यथातथ्य चित्र रंगवले. त्यामुळे माडगूळकरांची मायदेशी माणसे खोटे कारुण्य वा लटके आदर्श वा हळहळणे या दोहोंपासून बचावली, आणि माणसे म्हणून उभी राहिली. माडगूळकरांच्या कथांमध्ये पात्रांच्या मनाच्या स्पंदनाबरोबर समूहमनाचा गजरही ऐकू येतो. या समूहमनाच्या गजराशी कधी संवाद साधीत तर कधी विरोध दर्शवत कथा साकार होते...माडगूळकरांच्या कथांमध्ये ग्रामीण वास्तवता आणि सूक्ष्म नाट्य एकत्र येते. मनोविश्लेषणाचा पवित्रा न घेताही ते मनाची सूक्ष्मस्पंदने चित्रित करतात असे एका समीक्षकाने नोंदवलेले निरीक्षण वस्तुस्थितिनिदर्शकच आहे.

जनस्थान पुरस्काराच्या रूपाने आपल्या आजवरच्या लेखनाची पावतीच मिळाली असा कृतार्थतेचा भाव व्यंकटेश माडगूळकरांनी प्रकट केला. खरे तर त्यांना आजवर अनेक मानसन्मान लाभले आहेत, साहित्यसंमेलनास अनेक संमेलनांचे अध्यक्षपद

लाभले आहे आणि रसिक वाचकांकडूनही सतत दाद मिळत आली आहे. त्यामुळे लेखनाबद्दलच्या कृतार्थतेचा अनुभव त्यांना सतत येत असणारच. परंतु आता लेखन थांबल्यावर आणि 'सरवा' ही गोळा करून झाल्यावर 'जनस्थान' सारखा प्रतिष्ठेचा पुरस्कार हा विशेष सुखद भाव जागवणारा वाटणेही स्वाभाविक आहे. व्यंकटेश माडगूळकरांनी १९४५ च्या सुमाराला लेखन सुरू केले, नवकथेच्या उदयाचा हा काळ, गंगाधर गाडगीळ यांनी धोरणीपणाने आपल्या तीन सहकाऱ्यांची (अरविंद गोखले, पु. भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर) एक मोट बांधून चार नवकथाकारांची जंगी आघाडी उघडली आणि मराठी कथाक्षेत्रातील नव्या युगाची तुतारी फुंकली. गाडगीळांच्या कथेत मनोविश्लेषण, प्रयोगशीलता, संज्ञाप्रवाह, प्रतिमा-प्रतीकांचा वापर यावर भर होता. शहरी जीवनाची युद्धोत्तर काळातील नीतिमूल्यविषयक, नातेविषयक व व्यक्तीच्या आत्मप्रतिमेशी संबंधित बदलत्या मानसिकतेची चौफेर तपासणी व मांडणी गाडगीळांनी केली, आणि मराठी मध्यमवर्गाच्या बदलत्या मूल्यभानाला प्रथमच एक जाणवण्याजोगी चौकट प्रदान केली. अरविंद गोखले यांनी मध्यमवर्गीयांबरोबर अनुभवांचा आवाका व परिसर वाढवण्यासाठी लाल दिव्याच्या वस्तीतही मुलुखगिरी केली. पु. भा. भावे यांनी पारंपरिक हिंदुत्ववादी दृष्टीतून फाळणी, युद्धोत्तर मूल्यहीनता व मानवी संबंधातील उथळपणा यांच्यावर प्रहार करण्यासाठी कथावस्तूंची रचना केली. व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या अनुभवाशी, बालपणच्या माणदेशच्या माणसांशी व निसर्गाशी इमान राखून त्याचे कुठलाही 'इझम'च्या नादी न लागता यथातथ्य तटस्थ चित्रण करण्यावर भर दिला. आपल्या अनुभवावरच आधारित असे बहुतांशी लेखन केले. आपले प्रवास, निसर्गाचे अवलोकन, आपले वाचन, पर्यावरणाचे बदलते रूप, आपल्या परिवारातील स्नेहबंध, या बाहेर जाण्याचे टाळले. अत्यंत आत्मकेंद्रित अशा प्रतिभांच्या आंतरिक संचयावरच सर्वस्वी भर दिला.

अनेक कथांमध्ये स्वतः लेखक विद्यार्थी, शिक्षक, सुपरवायझर अशा नात्यांनीही येतो. तटस्थ साक्षीभावाने तो सर्व काही न्याहाळत राहतो.

माडगूळकरांनी ग्रामीण कथेला नवा आशय व आकृतिबंध दिला. एक लक्ष्मण रेषा त्यांनी आखून घेतली आणि आपल्या एकूण एक लेखनात पाच प्रसंगांचा एकजीव, कलात्मक, जिवंत, रसरशीत असा अनुभव अत्यंत रेखीवपणे, मोजक्या शब्दात, रंगरेषात त्यांनी चितारला. त्यांच्या बहुतेक व्यक्तिरेखा एकसंध आहेत, त्या व्यक्तिरेखा अथपासून इतिपर्यंत एकच एक मूल्यभान जपत राहतात.

जनस्थान पुरस्काराच्या निमित्ताने निवड समितीने ''अस्सल जीवनानुभवाचे सामर्थ्य लाभलेल्या माडगूळकरांनी पटकथालेखक, चित्रकार, आधुनिक मराठी कथेचे शिल्पकार



आदी रूपांनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे.'' असे नमूद केले आहे. बनगरवाडी, सत्तांतर, माणदेशी माणसं, सती, नागझिरा, चित्ररथी, आदि गाजलेल्या साहित्यकृतींमधून माडगूळकर यांचे उत्कट निसर्गप्रेम, सखोल चिंतन, करुणामयी जीवनभान यांचे दर्शन होते. माणदेशच्या वैराण भूमीशी माडगूळकरांच्या प्रत्येक माणसाची अतूट, एकजीव सांगड घातली गेली आहे, परंतु त्यांचे साहित्य हे केवळ माणदेशापुरतेच सीमित वा केंद्रित नाही. माणदेशचा हा माणूस असला तरी तो इतका त्याच्या मातीशी एकरूप झालेला आहे की तो कुठल्याही देशातल्या, कुठल्याही राज्यातल्या भूमिपुत्राशी दृढ नाते सांगू शकतो. त्या अर्थाने तो विश्वात्मक आहे. अत्यंत प्रादेशिक असलेल्या, आपल्या जन्मभूमीत, मातीत व वातावरणात रुजलेल्या व्यक्तीच विश्वात्मक ठरतात. त्या अर्थाने माडगूळकरांची माणसे ही दूरदेशच्या वाचकांनाही आपलीशी वाटतात. जवळची वाटतात. त्यामुळे 'बनगरवाडी' सारख्या पुस्तकांचे अनुवाद स्पॅनिश, फ्रेंच, इंग्लिश, रशियन वगैरे अनेक भाषांमध्ये झालेले आहेत. माडगूळकरांचे या निमित्ताने हार्दिक अभिनंदन!

संपादक


## ग्रंथप्रेमींसाठी खुषखबर !

आपल्यासाठी आम्ही एक आकर्षक सवलत योजना जाहीर करीत आहोत.

आपण मे ९९ पासून १० महिने दरमहा १०० रु. ची मनीऑर्डर पाठवा. मार्च २००० मध्ये १५०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व दर्जेदार पुस्तके घरपोच मिळवा.

**आमचा पत्ता :** मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०

## साहित्य वार्ता

### कबीर, ओशो यांची बंडखोरी सत्यशोधनासाठी

''संत कबीर व ओशो रजनीश यांच्या व्यक्तिमत्त्वातील बंडखोरी ही सत्यशोधनाच्या प्रक्रियेतील अपरिहार्य घटना होती,'' असे कवी मंगेश पाडगावकर यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ओशो रजनीश यांच्या 'ध्यानचित्रे', 'हसत खेळत ध्यानधारणा', 'एक एक पाऊल' व 'मी धार्मिकता शिकवतो धर्म नाही' या चार पुस्तकांचे प्रकाशन करताना सांगितले

समीक्षक डॉ. निर्मलकुमार फडकुले व मां अमृत साधना हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ओशो व कबीर हे आपल्याला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी देतात. त्यांचे साहित्य वाचताना निर्मळ अलिप्ततेने स्वतःकडे पाहण्यासाठी आवश्यक अंतर्मुखता प्राप्त होते, असे पाडगावकर यांनी सांगून आणि त्या दोघांमधील चार साम्यस्थळांविषयी विवेचन केले. पाडगावकर म्हणाले, ''ओशो व कबीर या दोघांच्याही व्यक्तिमत्त्वात विलक्षण बंडखोरी होती. सत्य शोधण्याच्या प्रक्रियेचा अपरिहार्य भाग म्हणून ही बंडखोरी येते. त्यांचे विचार वाचताना सत्य शोधण्याचे निर्मळ कुतूहल जागे होते. 'चूप बैस' व 'सांगतो तसे कर' या संस्कृतीमुळे येणाऱ्या मानसिक गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी ओशो व कबीर यांचे विचार प्रेरणा देतात. कबीर व ओशो हे दोघेही आपले खोटे आधार उखडून टाकतात. निराधार झाल्यानंतर आपणच आपले मार्ग शोधू लागतो, ही जाणीव करून देताना दोघेही कोणतीही तत्त्वज्ञानाची भाषा वापरत नाहीत. शब्द सुसंस्कृत झाले तर त्यातील उत्स्फूर्तता व जिवंतपणा नष्ट होतो याचीही त्यांना जाणीव आहे. आपणच आपल्याला बंधनात अडकवत असतो. स्वतःचीच इच्छाशक्ती स्वतःला मुक्त करू शकेल, ही शिकवणही ते देतात.''

ओशो यांच्या विचारातील नावीन्य आवाहनात्मक व चिंतन करायला लावणारे आहे, असे सांगून डॉ. फडकुले म्हणाले, ''ओशो यांच्या आध्यात्मिक विचारात लौकिकता



होती. मानवी जीवनातील सुखदुःखाविषयी मूलभूत चिंतन त्यांनी मांडले आहे. ओशो स्वीकारणे म्हणजे एक नवीन जीवनपद्धती स्वीकारणे होय.''

अंधपणे धर्माचे पालन करणारी माणसे खऱ्या अर्थाने धार्मिक नसतात; धार्मिकतेवर श्रद्धा ठेवणारी माणसे धर्मनिष्ठ असतात, ही जाणीव ओशो करून देतात. धार्मिक वास्तूंकडे जाणाऱ्या, जपजाप्य करणाऱ्या माणसांहून जीवनाशी एकनिष्ठ असणारी व्यक्ती खरी धार्मिक असते, असे ओशो मानत. प्रत्येक ऐहिक गोष्ट नाकारणारे धर्म खरे नव्हेत; तर जीवन स्वीकारणारे धर्म खरे धर्म आहेत तर यावर ओशो यांची श्रद्धा होती, असे डॉ. फडकुले यांनी सांगितले.

ध्यानाचा अनुभव देण्यासाठी ओशो शब्दांचा वापर करीत असत, असे मां अमृत साधना यांनी सांगितले. सुनील मेहता यांनी स्वागत केले. अनिल किणीकर यांनी आभार मानले.

### 'पुनर्जन्म' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

बेळगाव येथे दि. १० सप्टेंबर रोजी माधवी देसाई यांच्या कन्या. प्रा. मीरा यांच्या पुनर्जन्म या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रसिद्ध गीतकार सुधीर मोघे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी गोव्याचे माजी मंत्री रमाकांत खलप हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून दै. देशदूतचे संपादक शंकर सारडा उपस्थित होते. ''आजपर्यंतच्या कवयित्रींच्या काव्यसंग्रहातून वैवाहिक जीवनातील आशा-निराशांचे चित्रण दिसे; त्यात अपेक्षाभंगाचा सूर अधिक प्रभावशाली ठरून एकाकीपणाची कैफियत मांडली जाई. 'पुनर्जन्म'मध्ये प्रा. मीरा यांनी कवितेच्या रूपात आपल्याला आधार गवसला असून, आता आपण जगायचे ते कवितेसाठी असा निर्धार दिसतो. आपल्या जीवनासाठी कविता नसून, कवितेसाठी आपले जीवन आहे असे ठसठशीतपणे मांडणाऱ्या कवयित्रीचा आत्मविश्वास रसिकांना आल्हाददायक वाटेल,'' असे त्यांनी म्हटले प्रकाशक कॉंटिनेंटल प्रकाशनचे अनिरुद्ध कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. बेळगावमधील अनेक मान्यवर साहित्यिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

### प्रणालीमुक्त साहित्य

विजय पाठारे यांच्या 'अजूनही देठ हिरवा' या काव्यसंग्रहाचे सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते दि., १७ सप्टेंबर रोजी प्रकाशन झाले. त्या वेळी परशुराम देशपांडे आणि अंतर्नादचे संपादक भानू काळे यांनी प्रणालीमुक्त साहित्य या विषयावर आपले विचार मांडले. अध्यक्षस्थानी शिवाजी सावंत हे होते. कॉंटिनेंटल प्रकाशनने हा संग्रह काढला असून औंध ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य त्याला मोठ्या संख्येने हजर होते.

## केशव भिकाजी ढवळे प्रकाशन संस्थेचा शताब्दी महोत्सव

समाजाला विचार करायला लावायचा असेल तर वाचनाला पर्याय नाही. वाचनसंस्कृती वाढवायची असेल, तर मुलांसाठी अधिक पुस्तके प्रसिद्ध झाली पाहिजेत, असे प्रतिपादन 'सकाळ'चे संपादक विजय कुवळेकर यांनी केले. सध्या लोप पावत चाललेली वाचनसंस्कृती टिकवून ठेवणाऱ्या व संस्कृती जपणाऱ्या केशव भिकाजी ढवळे प्रकाशनासारख्या ध्येयनिष्ठ संस्थांना समाजानेच पाठबळ दिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

केशव भिकाजी ढवळे प्रकाशन संस्थेच्या शताब्दी समारोहाचे दि. २९ ऑगस्टला दादर येथील राजा शिवाजी विद्यालयाच्या बी.एन. वैद्य सभागृहात आयोजन करण्यात आले होते. शताब्दी महोत्सवानिमित्त ख्यातनाम लेखिका व ज्येष्ठ पत्रकार वसुंधरा पेंडसे-नाईक यांनी लिहिलेल्या 'मूल्याधार' व प्रसिद्ध प्रवचनकार सच्चिदानंद शेवडे यांनी लिहिलेल्या 'श्री चिंतामणी विजय कथासार' या पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले.

विजय कुवळेकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शताब्दी समारोहाचे उद्‌घाटन आणि दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. बदलती समाजव्यवस्था, दूरचित्रवाणी, माध्यमाचे मुलांवर होणारे परिणाम, वाचनसंस्कृती व मराठी भाषेचा ऱ्हास यांचा आढावा घेत ते म्हणाले, ''सामाजिक बांधिलकी, सामाजिक जाणीव हे शब्द वापरून वापरून आता गुळगुळीत झाले आहेत. मूल्यांचा ऱ्हास होत असून, बाजारी प्रवृत्ती सर्वत्र बळावत चालली आहे. वृत्तपत्रेही त्याला जबाबदार आहेत. सात्विकता आणि संस्कार हेच जीवनातून नष्ट होत चालले आहेत. वास्तविक शाळा आणि घर ही संस्कारांची केंद्रे आहेत; पण शाळांमध्ये टक्केवारीची भाषा चालते. घरामध्ये दूरचित्रवाणीमुळे पालक व मुलांचा संवादच खुंटला आहे. पालकच दूरचित्रवाणीवरील चित्रपट रात्री उशिरापर्यंत पाहतात. पालकांचे अनुकरण करून पुढे मुलेही हे चित्रपट पाहतात. त्यासाठी पालकांनीच स्वतःला विवेकाचा लगाम घातला पाहिजे.''

''मातृभाषेतून साधलेला संवादच मुलांना समजतो. इंग्रजी भाषेतून शिक्षण म्हणजे उच्चपद अशी आपणच समजूत करून घेतली आहे. डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासारखे जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञही मराठी माध्यमातून शिकून मोठे झाले आहेत. भाषा म्हणजे केवळ अक्षरे नसतात; तर भाषा ही संस्कृतीची वाहक असते. भाषेचा धागा तुटल्यावर संस्कृतीचा धागाही तुटतो. मुलांना प्रगतीच्या नावाखाली आपण भाषेपासून दूर नेतो.''

नवीन पिढीसाठी शताब्दी समारोहाच्या निमित्ताने ढवळे प्रकाशनने १०० थोर व्यक्तींची चरित्रे प्रकाशित करून तो संच मुलांपुढे ठेवावा. त्यामुळे मुलांवर चांगले संस्कार होतील, असे त्यांनी सुचवले.

वसुंधरा पेंडसे-नाईक म्हणाल्या, ''स्वतःच्या भाषेवर व आईवर प्रेम करा, हे



सांगण्याची वेळ येणे, हे लांच्छनास्पद आहे. आपल्या पाल्याला इंग्रजीत चांगले गुण मिळाले; पण तो मराठी विषयात अनुत्तीर्ण झाला, हे पालक अभिमानाने सांगतात. हे मराठी भाषेच्या दृष्टीने धोक्याचे आहे. गेली १०० वर्षे मुलांवर संस्कार करण्याच्या हेतूने रामरक्षा, मनाचे श्लोक प्रकाशित करणाऱ्या ढवळे संस्थेबद्दल त्यांनी गौरवोद्‌गार काढले. प्रवचनकार सच्चिदानंद शेवडे म्हणाले, ''सध्या जीवनात मूल्य म्हणून मुलांना कोणती गोष्ट दाखवावी असा प्रश्न आहे. पण मूल्ये जपणारी संस्था म्हणून ढवळे संस्थेकडे बोट दाखविता येईल. ढवळे प्रकाशन संस्थेने दर्जेदार ग्रंथ अत्यल्प किंमतीत समाजापर्यंत पोचविले.''

परचुरे प्रकाशन मंदिरचे अप्पा परचुरे, मॅजेस्टिक प्रकाशनचे संस्थेचे अशोक कोठावळे, पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ, ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगावकर, वामन देशपांडे, डॉ. रविन थत्ते, तसेच लेखक, चित्रकार, मुद्रक, पुस्तक विक्रेते आणि संस्थेचे व्यवस्थापक श्रीकृष्ण राणे यांचा तसेच विष्णू शेडेकर, नागू पाटील, सुरेश गडकरी, रामचंद्र पाटील, राजेंद्र कुडतडकर, उदय महाजन या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अंजली सरदेसाई यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला.

महापौर हरेश्वर पाटील यांनी पुष्पगुच्छ पाठवून ढवळे प्रकाशन संस्थेच्या संचालिका ज्योती ढवळे यांना शुभेच्छा दिल्या.

## साहित्य, संस्कृती मंडळातर्फे स्वस्त नामदेवगाथा

यंदाचे वर्ष संत नामदेवांच्या जन्मअष्टशताब्दीचे असल्यामुळे, भाविक वारकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन श्री नामदेव गाथा, संत नामदेव चरित्र व भावार्थ रामायण हे ग्रंथ पुनर्मुद्रित करण्याचा निर्णय साहित्यसंस्कृती मंडळाच्या २ सप्टेंबरच्या बैठकीत घेण्यात आला. यापूर्वी सरकारने शिक्षण विभागातर्फे प्रकाशित केलेल्या या ग्रंथांच्या प्रती संपलेल्या आहेत आणि भाविकांच्या नित्य पठणाचे ग्रंथ सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण आहे, त्यामुळे या ग्रंथांचा निर्मितीखर्च जरी जास्त असला तरी नामदेव गाथा व भावार्थ रामायण हे जाडजूड ग्रंथ प्रत्येकी दीडशे रुपयांना व संत नामदेव चरित्र पन्नास रुपयांना विकण्याचा निर्णय मंडळाने घेतला. या तिन्ही ग्रंथांच्या प्रत्येकी पाच हजार प्रती छापण्यात येणार आहेत.

## ज्ञानोदय लेखनसार सूची

मंडळातर्फे प्रकाशित व्हावयाच्या 'ज्ञानोदय लेखनसार सूची' या ग्रंथाचे निर्मितीमूल्य १२३३ रुपये असले, तरी तो ग्रंथही सवलतीने तीनशे रुपयांना विकण्याचा निर्णयदेखील मंडळाने घेतला.

मंडळाने प्रकाशित केलेल्या 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे' या पुस्तकाची पाच हजारांची पहिली आवृत्ती हातोहात संपली. त्या पुस्तकाला असलेली मोठी मागणी लक्षात घेऊन पाच हजार प्रतींची दुसरी आवृत्ती छापण्यास लोकवाङ्मयगृहास सांगण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

## तीन काव्यसंग्रहांचे प्रकाशन

सुलभा वसंत कामत यांच्या ''एकेक पान गळताना...'', ''कवडसे'' व ''हिरवा ऋतू'' या तीन कवितासंग्रहांचे प्रकाशन भीमाराव पांचाळे यांच्या हस्ते दि. २७ जून १९९९ रोजी पुण्यात करण्यात आले. अध्यक्षपदावरून बोलताना रवींद्र भट यांनी म्हटले, ''एका स्त्रीने लिहूनही या कवितांची जात खूपच वेगळी आहे.'' भीमराव पांचाळे यांनी म्हटले, ''सुलभा कामत यांच्या कवितांबरोबरच त्यांच्या गझलरचनाही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.'' सुलभ प्रकाशनच्या या समारंभाला रमण रणदिवे, संगीता जोशी, प्रा. डॉ. सुरेशचंद्र नाडतणी इ. उपस्थित होते.

## अभ्यासक आणि सांप्रदायिक यांच्यातील दरी भरून काढणारा ग्रंथ

'ज्ञानेश्वरी'तील विविध रसांचे विवेचन करणाऱ्या 'नवरसी भरवी सागरू' या ग्रंथाचे प्रकाशन संतसाहित्याचे अभ्यासक व प्रसिद्ध साहित्यिक प्रा. राम शेवाळकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रा. शिवाजीराव भोसले होते.

सर्वच वक्त्यांनी हा ग्रंथ सिद्ध केल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि साखरे महाराजांनी मराठी सारस्वतात फार मोलाची भर घातली आहे असे नमूद केले.

संतसाहित्याचे विद्यापीठीय अभ्यासक आणि सांप्रदायिक लोक यांच्यातील दरी भरून काढण्याचे अतिशय महत्त्वाचे काम किसनमहाराज साखरे यांच्या ग्रंथाने केले आहे. अभ्यासक आणि सांप्रदायिक यांची अनोळख या ग्रंथामुळे फिटली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी पुणे येथे केले.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''हा केवळ काव्यग्रंथ नाही. त्यातील अक्षरे शाईने लिहिलेली नाहीत. ती प्रकाशाची अक्षरे आहेत. सर्व रसांमध्ये शृंगार हा मुख्य रस मानला जातो; परंतु या रसाच्या माथीदेखील शांतरसाचा पाय आहे आणि शांत रसातूनच अन्य रसांची निर्मिती झाली आहे, हे या ग्रंथातून निर्विवादपणे सिद्ध करण्यात आले आहे. ज्ञानेश्वरीमध्ये पहिल्या आणि अकराव्या अध्यायातच अन्य रसांना प्रकट होण्यासाठी जागा आहे. बाकी सगळीकडे शांतरसच आहे. 'ज्ञानेश्वरी'तील कथाभाग आणि विश्वरूप दर्शन यात जे दृष्टान्त आहेत, त्यांपैकी काहींमध्ये शृंगाराचे दर्शन होते; पण ते रसनिर्मिती करत नाहीत, रसदर्शक आहेत. त्यांची स्थळे अलंकारातून आली आहेत.''



प्रा. शेवाळकर म्हणाले, ''या ग्रंथाने साहित्य क्षेत्राला उन्नत होण्याचा आत्मविश्वास मिळवून दिला आहे. शांत व भक्तिरसाचा आविर्भाव 'श्रीमद्भगवद्गीता' वगळता अन्य संस्कृत ग्रंथांमध्ये फारसा आढळत नाही. मराठीत मात्र हा रस उचंबळताना दिसतो. भक्तिरस आणि शांतरस यांमध्ये सूक्ष्म फरक आहे; मात्र इतर सर्व रस म्हणजे शांतरसामध्ये उमटलेले तरंग आहेत. किसन महाराज साखरे यांच्या या ग्रंथाची भाषा साधी, सोपी नाही; ती न्यायघटित आहे. मात्र तरीही रसशास्त्राचे विवेचन करण्याचे सामर्थ्य वाढते.''

प्रा. शिवाजीराव भोसले म्हणाले, ''ज्ञान आणि ईश्वर या ग्रंथामुळे एकत्र आले आहेत. ते इतक्या जवळ आले हे आश्चर्यच मानले पाहिजे. हा ग्रंथ ज्ञानेश्वरांचा सखोल परिचय करून देणारा ठरणार आहे.'' साखरे महाराजांनी या ग्रंथाच्या निर्मितीची प्रक्रिया विशद केली. विश्वशांतीसाठी ज्ञानेश्वरीच आधारभूत ठरेल, असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले. 'यशोधन प्रकाशन'तर्फे हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यात आला आहे. ॲड. बाबासाहेब लवाटे यांनी आभार मानले.

## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे तीन पुरस्कार

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातर्फे सौ. वासंती गंगाधर गाडगीळ सार्वजनिक विश्वस्त निधीतून प्रतिवर्षी गोपाळ कृष्ण गाडगीळ पारितोषिक, देशभक्त विष्णु गणेश तथा तात्यासाहेब शेणई खटखटे पारितोषिक, कुसुम गोपाळ गाडगीळ पारितोषिक, असे ३ पुरस्कार देण्यात येतात.

महाराष्ट्रीय संस्थांतून भाषा-साहित्य, ग्रंथालय चळवळ या व महाराष्ट्रीय संस्कृती विषयात कार्य करणाऱ्या सेवाभावी कार्यकर्त्यास दिला जाणारा यंदाचा गोपाळ कृष्ण गाडगीळ पुरस्कार (रु. १,५००/-) नाशिक येथील मुरलीधर शंकर औरंगाबादकर यांना देण्यात आला.

देशभक्त विष्णु गणेश तथा तात्यासाहेब शेणई-खटखटे पुरस्कार (रु.१,५००) औरंगाबादचे भास्कर बी. आर्वीकर यांना देण्यात आला.

या वर्षीपासून सुरू करण्यात आलेले कुसुम गोपाळ गाडगीळ पारितोषिक रत्नागिरीचे अरुण नेरुरकर यांना देण्यात आले.

वरील तिन्ही पुरस्कारांसाठी परीक्षक म्हणून सौ. वासंती गाडगीळ, नरेंद्र पाटील, व. ग. जावडेकर, र. दा. कुलकर्णी व सौ. सुषमा माने यांनी काम पाहिले.

## कुरुंदकर पुरस्कार

नांदेड येथील जि. प. तर्फे दरवर्षी नांदेड भूषण नरहर कुरुंदकर पुरस्कार देण्यात येतो, त्या अनुषंगाने १९९६ चा पुरस्कार प्रसिद्ध साहित्यिक प्रा. शेषराव मोरे यांना

जाहीर करण्यात आला. १९९८-९९ चा पुरस्कार प्रा. अमृत देशमुख यांना जाहीर करण्यात आला. दि. ९ फेब्रुवारी ९७ रोजी कुरुंदकर यांच्या पुण्यतिथी दिनी हा पुरस्कार प्रा. मोरे यांना सन्मानपूर्वक देण्यात येणार होता. तसे अधिकृत पत्र शिक्षण विभागातर्फे प्रा. मोरे यांना मिळाले होते. परंतु तसे घडले नाही. आज पावेतो जि. प. नांदेडला याचा विसर पडला, यामुळे प्रा. मोरे यांना अतिशय मनस्ताप झाला. १० हजार रु. व सन्मानपत्र असे स्वरूप असलेला हा पुरस्कार वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. कुरुंदकरांना कोणताच पुरस्कार मान्य नव्हता. नांदेड सारख्या ठिकाणाहून साहित्यिकांचे सारथ्य करणाऱ्या या व्यक्तीला जिवंतपणी तर अनेक संघर्षाना तोंड द्यावे लागलेच परंतु मृत्यूनंतरही त्यांच्या नावावर चालणारा हा खेळखंडोबा म्हणजे एक प्रकारची विटंबना आहे, ही विटंबना थांबावी अशी मागणीही एका पत्रकात दिवाकर चौधरी यांनी केली.

## मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय कवी प्रफुल्लदत्त स्मारक पारितोषिक

कवी प्रफुल्लदत्तांची स्मृती व कार्य चिरंतन रहावे या उद्देशाने कवी प्रफुल्लदत्त स्मारक समितीने दिलेल्या रु. १५,०००/- देणगीच्या व्याजातून गेल्या ८ वर्षापासून आदर्श शिक्षक, उदयोन्मुख उत्तम कवी आणि कुशल संपादक यांना प्रतिवर्षी रु. १,००१ चे पारितोषिक दिले जात आहे.

यंदाच्या पुरस्कारासाठी निवडसमितीने कवी दासू वैद्य जालना यांची निवड केली.

## 'पाककृतीचा खजाना' मराठी भाषेत

महाराष्ट्रातील कुटुंबियांसाठी नुकतेच 'भारतीय पाककृतीचा खजाना' हे पुस्तक मराठीत प्रसिद्ध करण्यात आले. देशातील नामवंत मास्टर चेफ संजीव कपूर यांनी लिहिलेल्या 'खजाना ऑफ इंडियन रेसिपी'चे हे मराठी भाषांतर पॉप्युलर प्रकाशनने प्रकाशित केले आहे. खुद्द संजीव कपूर यांच्या हस्ते या पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन करण्यात आले. 'खाना खजाना' या दूरचित्रवाहिनीवरील लोकप्रिय कार्यक्रमातील अनके पाककृती या पुस्तकात दिल्या आहेत.

## परिवर्तनवादी चळवळीत सर्व लेखकांनी मिसळावे

''राजकारण आणि समाजकारणातील परिवर्तनवादी चळवळीत जनमताचा कानोसा घेऊन सर्व लेखकांनी मिसळले पाहिजे,'' असे मत ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांनी बंधुता प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रकट मुलाखतीत व्यक्त केले. 'माणसाच्या दारी प्रबोधनवारी' या कार्यक्रमात एस.एन.डी.टी. महाविद्यालयाच्या प्राचार्या व समीक्षक डॉ. अश्विनी धोंगडे आणि कवी उद्धव कानडे यांनी ही मुलाखत घेतली.

देशापुढील सध्याच्या समस्या, समाजातील वेगवेगळ्या प्रवाहांचे मनोमिलन आणि



त्यासाठी राजकीय पक्ष; तसेच सामाजिक संस्थांची जबाबदारी याबद्दलची मते त्यांनी या वेळी मांडली. व्यक्ती आणि कवी म्हणून स्वतःची जडणघडण कशी झाली हे त्यांनी सांगितले.

कवी आणि विचारवंत कोणा एका ज्ञातीचा नसतो, असे सांगून ते म्हणाले, ''अशा व्यक्तींचे विचार हा समाजाचा ठेवा असतो. सध्या विविध प्रश्नांच्या गदारोळात संपूर्ण समाजमन ढवळून निघत असताना एकता आणि बंधुतेचा विचारच सर्वांना पुढे नेईल.''

राजकारण आणि समाजकारणातील चळवळीबाबत मराठी लेखक उदासीन आहेत का, या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले, ''अनेक पुरोगामी लेखकांनी अशा चळवळींना नेहमीच पाठिंबा दिला आहे. मराठी साहित्याची परंपरा उदारमतवादी आहे. जेव्हा लेखनाची सर्व सूत्रे मध्यमवर्गीयांकडे होती, तेव्हा त्यांनी स्वतःचे विश्व म्हणजेच समाजदर्शन मानले; वि. वा. शिरवाडकर, केशवसुत, सानेगुरुजी, बा.सी.मर्ढेकर, आचार्य अत्रे आदी अनेकांनी परिवर्तनवादी आणि समाजकल्याणाचे विचार मांडले; परंतु या बंडखोर विचारांचा महानद झाला नाही.''

शहरातील चंगळवादी संस्कृतीच्या जोडीलाच परभाषेचा अनुनय करण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्याने मराठी भाषेची झपाट्याने अधोगती होत आहे, असे त्यांनी नमूद केले. वास्तवाच्या झळा सोसत आणि टक्केटोणपे खात काही चांगले शब्द गिरविले. कष्टमय जीवनातील वेदना भोगताना प्रतिभा असल्याशिवाय ती समर्थपणे व्यक्त करता येत नाही, असे त्यांनी सांगितले.

कवीचे अंतःकरण तापलेल्या हलगीप्रमाणे हवे, म्हणजे बोट उमटवील तसा आवाज निघेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. बंधुता प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष प्रकाश रोकडे यांनी प्रास्ताविक केले. एस. एस. पंडित यांनी आभार मानले.

## व्यवस्थापन शिकणाऱ्यांना 'नेकसाहेब' मार्गदर्शक : गोखले

''व्यवस्थापनशास्त्र शिकणाऱ्यांना 'नेकसाहेब' हे आत्मचरित्र प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरेल'' असे समाजशास्त्रज्ञ डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी माजी औद्योगिक संचालक आनंद केळकर यांच्या 'नेकसाहेब' या आत्मचरित्राचे प्रकाशन करताना म्हटले. ज्येष्ठ उद्योगपती डॉ. नीलकंठ कल्याणी अध्यक्ष व मुकुंदराव किर्लोस्कर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. गोखले म्हणाले, ''रुक्ष व तांत्रिक भाषा न वापरता सोप्या शब्दांमध्ये अनुभवाचे समृद्ध भांडार वाचकांसमोर खुले केले आहे. व्यवस्थापन क्षेत्रातील त्यांचे विविध अनुभव इतरांना मार्गदर्शक ठरतील.''

डॉ. कल्याणी म्हणाले, ''कामावरील निष्ठा व प्रामाणिकपणा हे केळकरांचे वैशिष्ट्य

आहे. 'भारत फोर्ज'च्या उभारणीसाठी त्यांच्या मार्गदर्शनाचा मला मोठा फायदा झाला.''

किर्लोस्कर म्हणाले, ''वाचकांना आवडेल अशा पद्धतीचे लिहिणे खूप अवघड आहे. केळकर यांचे पहिले पुस्तक मी प्रकाशित केले असून, त्यामध्ये त्यांच्या लिखाणाची सर्व वैशिष्ट्ये दिसून आली होती.'' सुवर्णा जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

## सदानंद देशमुख यांच्या कादंबरीस पुरस्कार

'मॅजेस्टिक प्रकाशना'तर्फे देण्यात येणाऱ्या जयवन्त दळवी स्मृति-पुरस्कारासाठी सदानंद देशमुख यांच्या 'तहान' या कादंबरीची पारितोषिक समितीने निवड केली आहे.

हे पारितोषिक रु. ११,१११/- चे असून मुंबई येथे समारंभपूर्वक देण्यात येईल असे पारितोषिक समितीचे निमंत्रक अशोक कोठावळे यांनी सांगितले.

के. ज. पुरोहित, वि. शं. चौघुले, डॉ. मंगला आठलेकर यांच्या निवडसमितीने म्हटले आहे की, मुळातच सर्व तऱ्हेच्या अभावाने ग्रासलेलं आयुष्य ज्यांच्या वाट्याला आलं अशा खेड्यापाड्यातून जगणाऱ्या माणसांची ही कहाणी. जुनी पिढी भौतिक सुखाच्या तृष्णेपोटी मूल्यहीन मार्गाकडे जाणारी. यातून त्यांच्या वाटेला येणारी प्रचंड घुसमट त्यांचं अवघं आयुष्यच कसं उद्‌ध्वस्त करून टाकते, याचं अत्यंत प्रत्ययकारी चित्रण सदानंद देशमुख या कादंबरीतून उभं करतात. यामुळे विशिष्ट ग्रामीण परिसराच्या बोलीत लिहूनही संवादाची क्षमता असलेली आणि मांडणीचा अंगभूत वेग घेऊन येणारी ही कादंबरी प्रभावी आहे.

## मराठीला वाचविणार ना?

देशातल्या लोकसभा निवडणुकीबरोबरच महाराष्ट्रातही विधानसभेसाठी निवडणुका होणार असल्याने राजकीय पक्ष प्रचार मोहिमेत गुंतले आहेत. महाराष्ट्रात मराठी भाषा ही राजभाषा आहे असे मान्य करण्यात आले असूनही अद्याप मराठी भाषेबद्दल आणि मराठी माणसाचा उत्कर्ष साधण्याबद्दल समाधान वाटावे अशी परिस्थिती नाही. त्यामुळेच जागतिक मराठी अकादमीने महाराष्ट्रातील जनतेला एक आवाहन केले असून जनतेने राजकीय पक्षांना 'मराठी भाषेबद्दल तुमचे काय मत आहे?' असा स्पष्ट सवाल केला पाहिजे, असे प्रतिपादिले आहे. जागतिक मराठी अकादमीची ही सूचना नक्कीच स्वागतार्ह असून महाराष्ट्रातील प्रचारसभांतच लोकांनी विविध पक्षनेत्यांना हा प्रश्न जाहीरपणाने विचारला पाहिजे. गेल्या चाळीस वर्षात मराठी भाषेची आणि मराठी माणसांची दूरवस्था झाली आहे आणि त्याला सरकार, राजकीय पक्ष आणि मराठी भाषक नागरिक हेही तितकेच जबाबदार आहेत हे त्यांचे मतही रास्तच आहे.

भाषा हे लोकव्यवहाराचे साधन असले तरी राजभाषा ही सर्वच व्यवहारात तितक्याच



समर्पकपणे आमि समर्थपणे जर वापरात आणली जात नसेल, तर उगीचच राजभाषेचा पोकळ अभिमान फक्त साहित्य संमेलनासारख्या कार्यक्रमात मिरविण्यात काय अर्थ आहे? एका ठरावापलीकडे त्या संदर्भात काहीही केले जात नाही. सरकारही त्याची दखल घेत नाही आणि राजकीय पक्षही त्याबद्दल कधी आस्था दाखवित नाहीत. अद्यापही मराठी भाषेचा वापर सरकारी व निमसरकारी पातळीवर प्रभावीपणाने केला जात नाही. तसेच न्यायालयीन क्षेत्रातही अद्याप राजभाषेचा वापर करण्यात येत नाही. विशिष्ट कालावधीचे बंधन घालून या संदर्भात क्रियाशील राहण्याचे अभिवचन सरकार वा राजकीय पक्ष केव्हा देणार? खरे तर महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या वेळीच विविध राजकीय पक्षांचे जाहीरनामे प्रसिद्ध केले जातात. त्यात मराठी भाषा व मराठी माणूस यांच्या उत्कर्षासाठी 'ब्र' ही काढलेला नाही. दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वापर केला पाहिजेच. शासकीय स्तरावर आणि न्यायालयीन पातळीवरही तो केला जाण्याची नितांत आवश्यकता आहे, हेही तितकेच खरे आहे.

**(दैनिक संचार, सोलापूर)**

## 'दिगंबरा' कादंबरीस मराठी अकादमीचा पुरस्कार

अवधूत य. कुडतरकर यांची 'दिगबंरा' ही कादंबरी गोमंतक मराठी अकादमीच्या १९९८-९९ च्या साहित्य पुरस्काराची मानकरी ठरली आहे.

अवधूत कुडतरकर यांची आतापर्यंत 'रंभागर्भ', 'हिमनग' (कवितासंग्रह), सांजवेळ (ललित) जंतरमंतर, नवलनगरी (बालकथा) व दिगंबरा (कादंबरी) आदी पुस्तके प्रसिद्ध झाली असून त्यांच्या दोन्ही कवितासंग्रहांना गोवा कला अकादमी व गोमंतक मराठी भाषा परिषदेचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

मान-अपमान, सुख-दुःख, आत्मानंद आणि आत्मक्लेश, ऐहिकता आणि अध्यात्म, प्रणय आणि वैराग्य अशा प्रकारच्या सातत्यपूर्ण द्वंद्वात्मक आयुष्याची मर्मभेदक मांडणी करून आदर्शवादाच्या चौकटी मोडून नागडे-उघडे सत्य जगासमोर मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे; हा प्रयत्न जाणीवपूर्वक नसून नेणिवेच्या पातळीवर आहे व हेच या कादंबरीचे वैशिष्ट्य असल्याचे कवी अशोक नाईक यांनी म्हटले.

## बी. रघुनाथ पुरस्कार

मराठवाड्याचे थोर लेखक बी. रघुनाथ यांच्या नावे औरंगाबादच्या परिवर्तन संस्थेतर्फे देण्यात येणारा पुरस्कार यावर्षी नारायण कुलकर्णी कवठेकर यांच्या 'मागील पानावरून पुढे चालू' या संग्रहाला देण्यात आला.

## दिवाळी अंकाबद्दल!

## मराठी ग्रंथजगतचा वैशिष्ट्यपूर्ण दिवाळी अंक

ऐन दिवाळीत आपल्या हाती पडणार एरव्हीच्या अंकात आपली भेट प्रकाशित झालेल्या नव्याकोऱ्या पुस्तकांशी होते. या अंकात आपल्याला पाहायला मिळणार आहे झलक आमच्या आगामी पुस्तकांची!

### माझे जिवलग स्नेही

न्यायमूर्ती राजाभाऊ गवान्दे यांनी आपल्या विविध निकालांनी एक काळ गाजवून सोडला. 'श्यामा' या कादंबरीवरील अश्लीलतेचा खटला त्यांच्यापुढेच चालला आणि त्यांचा निर्णय सुप्रीम कोर्टानेही कायम ठरवला. अध्यात्माचीही त्यांना आवड आहे. तसे काही अनुभवही त्यांना आले आहेत. अशाच एका अध्यात्ममार्गी मित्राची त्यांनी सांगितलेली गोष्ट. 'आठवणीचा मोहर'मधून.

### मला डायव्होर्स हवाय

सुनील गंगोपाध्याय यांच्या मंदिर या कादंबरीतील एक प्रकरण. ब्रिटिश खासदार टॉमस याच्याशी पंचवीस वर्षे संसार केलेली बंगाली तरुणी मंदिरा एके दिवशी त्याला सांगते, ''मला घटस्फोट हवाय. तुझ्या जीवनात आता मला काहीच स्थान उरलेले दिसत नाही.'' असे का होते?... स्त्रीमनाचे एक हृदय दर्शन.



### रम्य धुक्याची अद्‌भुत सृष्टी

मराठी रोमँटिक काव्यप्रतिभेचा मागोवा घेऊन रोमँटिसिझनचे गूढ उकलून दाखवणाऱ्या प्रा. रमेश तेंडुलकर यांच्या समीक्षाग्रंथातील एक प्रकरण. रोमँटिक काव्याची लक्षणे व आव्हाने विशद करणारे.

### स्वयंसिद्धा सुलोचना

मराठी चित्रपटसृष्टीतील शीतल नंदादीपाप्रमाणे सात्त्विक तेजाने तळपणाऱ्या सुलोचनाबाईंचे त्यांच्याच कन्येने-कांचन घाणेकर यांनी रेखाटलेले भावस्पर्शी व्यक्तिचित्र. (रेशीमगाठी या पुस्तकातून)

### महात्मा

महात्मा फुले– सत्यशोधक समाजाची स्थापना डॉ. रवीन्द्र ठाकूर यांच्या आगामी 'महात्मा' या कादंबरीतील एक प्रकरण.

### रावीपार

'मरणभय' – हिंदु-मुस्लीम दंग्याच्या पार्श्वभूमीवरील गुलजारची कथा. (रावीपार या गुलजारच्या पहिल्याच कथा संग्रहातून)


### शिकार वाघाची

सुंदरबनच्या घनदाट जंगलात तरुण शिकारी. अर्जन सरदार याने केलेल्या वाघाच्या शिकारीची अफलातून कहाणी. (सुंदरबनच्या जंगलात. अनुवाद तारा पंडित)

### आपले सौंदर्य

वर्षभरातील विविध ऋतूत आपल्या शरीराची काळजी कशी घ्यावी याविषयी आंतरराष्ट्रीय सौंदर्य-स्पर्धांच्या परीक्षक श्रीमती ब्लॉसम कोचर यांनी दिलेल्या अनेक उपयुक्त टिप्स.

आणि
याशिवायही आणखी कितीतरी!
अथपासून इतिपर्यंत वाचनीय आणि संग्राह्य
ऐन दिवाळीत आपल्या भेटीला येणार!




## 'स्तनपान' अर्थातच आईचं दूध : बाळासाठी!


**लेखिका : डॉ. ज्योत्स्ना पडळकर**

**'स्तनपान'**

'स्तनपान' या नाजूक हळव्या आणि गुपित गोष्टीवर आजवर चर्चा झाली नाही, की मोकळेपणानं कुणी काही सांगितलं नाही आणि मनातल्या शंका कुणाला विचारू? कधी विचारू? अशा संभ्रमात विचारायचं राहूनच गेलं. पण आता, **'आईचं दूध : बाळासाठी!'**च्या रूपानं डॉक्टर सततच तुमच्याजवळ असतील– जरूर भासेल तेव्हा लगेच तुमचे प्रश्न सोडवायला.

आता मनातला गोंधळ संपवून वेगळ्या आत्मविश्वासानं आपल्या बाळाला पाजत राहा, आणि त्यात यशस्वी व्हा.

- **मूल्य : १००/-**
- **सवलत मूल्य : ७०/-**




**मुलाच्या जन्मापासून वयात येईपर्यंतच्या सर्व प्रश्नांची उत्तरं देणारं आपल्या घरी हवंच,**

**असं बालसंगोपनावरील अप्रतिम पुस्तक**

## नवी बाळगुटी : पालकांसाठी!

**लेखिका : डॉ. ज्योत्स्ना पडळकर** एम्. डी. (बालरोग), पुणे

- **सर्वगुणसंपन्न पुस्तक!** पालक, शिक्षक, विद्यार्थी, डॉक्टर्स, नर्सेस् या सर्वांना अत्यंत उपयुक्त ठरेल. खूप नवी माहिती मिळेल.

  **डॉ. आनंद पंडित,** डायरेक्टर ऑफ पेडियाट्रिक्स, के.ई.एम्.हॉस्पिटल, पुणे.
- मुले चांगली वाढवण्याकरिता खास जोपासनेची जरूर असते. यासाठी योग्य माहिती असलेल्या पुस्तकाची उणीव या पुस्तकाने भरून काढली आहे.

  **डॉ. यशवंत आमडेकर,** प्रेसिडेंट, इंडियन ॲकेडमी ऑफ पेडियाट्रिक्स.
- या पुस्तकाच्या नियमित आणि अभ्यासपूर्ण वाचनाने घरातली अनुभवी वडिलधाऱ्यांची उणीव भरून निघेल. प्रत्येक पालकाने संग्रही ठेवण्याजोगे पुस्तक.

  **डॉ. रमेश पोतदार,** प्रेसिडेंट ऑफ असोसिएशन्स ऑफ पेडियाट्रिक सोसायटीज् ऑफ द साऊथ ईस्ट एशियन रीजन.

- **मूल्य रु. १५०/-**
- **सवलत मूल्य रु.१००/-**

**प्रमोद प्रकाशन १०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०. फोन : ४४७८९९६**

**सर्व प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध**



## *''लक्ष्मण गोगावले यांचा गणितावरील चमत्कार''*

**किंमत रु. २५/- प्रत्येकी**

### मुलांना गणिताची आवड निर्माण करणारी पुस्तके


**मण्यांची जादू**





**गणितरंजन**




**गट्टी गणिताशी**




**लक्ष्मणाची डायरी**





## प्रा. भास्कर जोहरापूरकर


**किंमत रु. ४०/- प्रत्येकी**

### यांची नवीन पुस्तके आपल्या संग्रही हवीतच


**महाराष्ट्रातील शहरे**





**महाराष्ट्रातील नद्या**




**नयनरम्य सरोवरे**




**अमृतवृक्ष कडुनिंब**




**प्रमोद प्रकाशन**

**१०१९, सदाशिव पेठ,**

**नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.**

**फोन : ४४७८९९६**

**सर्व प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध**




## सर्पसृष्टी

**लेखक : अनिल खैरे**

**सर्पांविषयी माहितीपूर्ण पुस्तक**

**किंमत ४० रु.**


किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम मेंटेनन्स ॲण्ड रिपेअर्स ऑफ इले. डोमेस्टिक ॲप्लायन्सेस्

# घरगुती इलेक्ट्रॉनिक उपकरणे (दुरुस्ती आणि देखभाल)

Maintenance & Repairs of Elec. Domestic Appliances




इयत्ता ११ वी (भाग१)
मूल्य रु. ५०/-




इयत्ता १२ वी (भाग २)
मूल्य रु. ४०/-

लेखक : यंत्रानंद

एम्. सी. व्ही.सी. (इ. ११ वी आणि १२ करिता), आय्. टी. आय्. वायरमन, इलेक्ट्रिशियन, इलेक्ट्रॉनिक्स, इ. कोर्सेस् आणि कारागीर यांच्यासाठी उपयुक्त पुस्तक!

**या विषयावरचे मराठी भाषेतील पहिले पुस्तक**

---




**नुसती स्वप्नं बघून यश मिळत नसतं. त्याकरता काहीतरी करावं लागतं! जीवनात यशस्वी होण्यासाठी खालील पुस्तक प्रत्येकाने वाचलेच पाहिजे.**

## करोडपती कसे व्हावे?

अर्थात् (जीवनात यशस्वी कसे व्हावे?)

लेखक : अरुण हरकारे • मूल्य : १३०/-

---

**“ विद्यार्थ्यांनो, आपला आत्मविश्वास वाढवा! ”**

विचार ते कृती हा पावलांचा प्रवास... आपल्या मनात खळबळ माजवेल... आणि यशाकडे झेप घेण्याचा... आपला प्रवास सुरू होईल. अरुण हरकारे लिखित.

**किल्ली गुणवत्ता यादीची** • मूल्य : ७०/-




प्रमोद प्रकाशन १०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०. फोन : ४४७८९९६. सर्व प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध




# शाळा/कॉलेज मधील विद्यार्थ्यांना शिक्षण संपवून बाहेरच्या व्यवहारी जगात प्रवेश करताना स्वयंरोजगाराच्या वाटा दाखवणारी पुस्तके

## प्रत्येक शाळा / कॉलेज मधील ग्रंथालयासाठी अत्यावश्यक पुस्तके




मूल्य : रु. ५००/-
सवलत मूल्य : रु. ४००/-




मूल्य : रु. ५०/-
सवलत मूल्य : रु. ४०/-

प्रमोद प्रकाशन १०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०. फोन : ४४७८९९६

# पुस्तक परिचय

ग्रामीण जीवनातील कौटुंबिक ताणतणाव आणि मनस्वी व्यक्तिमत्त्वे यांचा मेळ

## *प्रवाह*

**पांडुरंग कुंभार**




''रांडमुंड बाई म्या. दोन वर्सबी संसार केला न्हाई. माझं कपाळ पांढरं झालं. कुणाचा आधार न्हाई. पण वाघागत दोन दीर हाईत म्हणून माझा कढ आवरला. चुलत दीर असूनही सख्खे दीर मानून त्यांच्यासंगं वागले. पण जानणूक ठेवली न्हाई त्यांनी. तीन तीन पोरांचं बाप झाल्यात पण शेण खायला वखवखल्यात.'' स्वतःच शेतावर राबणारी गौरा गव्हाळी चेहऱ्यावर संताप फुलवत मानेला हिसडा देत आपली कैफियत वैजनाथ सरपंचाला सांगते.

गोविंदा आणि पिराजी हे गौराचे दीर. त्यांना वैजनाथ समजावून सांगतो. गौराला मदत करायला, धीर द्यायला हवा असं सुचवतो. पण ते आडमुठे. ''जित्ती गाडीन तिला तवाच थंड व्हईल आमचा जीव!'' असं गोविंदा म्हणतो. नांगरटीचा हंगाम आल्यावर गोविंदा गौराला भेटून सांगतो, ''आवंदापासून सारी कामं आमीच करनार. तू तिकडं फिरकायचं नाहीस.'' तर गौरा म्हणते, ''माझं जीवमान हाय तोवर माझ्या शेतात तुमी पाऊल टाकायचं कारण न्हाई. माझं म्या करनार.'' गोविंदा चिडतो. ''तोंड वर करून आमास बोलतीस? तुझा मुडदा पाडतो. जीव घेतो. फाशी जातो'' म्हणत तो थोरला दीर तिच्या घरात शिरू पाहतो. ती ओरडते. शेजारीपाजारी गोळा होतात. तक्रार सरपंचाकडे येते.

सरपंच गौराच्या सोबतीला राहण्यासाठी साठी ओलांडलेल्या सच्छील चांगदेवमामाला तयार करतो. तर त्याच्या घरावर दगड पडू लागतात.

''तुझं शेत मला करायला दे. तू सांगशील त्या परमानं खंड भरीन.'' अशी तयारी वैजनाथ सरपंच दाखवतो, तेव्हा गौरा कृतज्ञतेच्या भावनेने म्हणते, ''माझ्या परसंगाला तुमी थोरल्या भावागत माझ्या मागं उभा ऱ्हायलासा. माझी सोय लावलासा. तुमचं उपकार ह्या जन्मात फिटनार न्हाईत.'' पण खंडाने शेत मागणाऱ्या वैजनाथला गौरा शेताबाबत मात्र स्पष्ट नकार देते. ''माझ्या जीवात जीव तवर माझी जमीन म्या करीन. त्यात दुसऱ्याला पाऊल टाकू द्यायची न्हाई. नवरा गेला पन म्या दुसरा घरोबा केला न्हाई. वय असून म्या तशी ऱ्हायले. मला सुख न्हाई असं समजून ऱ्हायले. आज भाऊ म्हणून समोर हाईसा. आज तुमच्या समूर तोंडातनं शब्द बाहीर पडल्यात.'' सरपंच वैजनाथ त्या नकारामुळे काय करतो? शेत खंडावर मागण्यामागे त्याचा काय हेतू असतो?.. गोविंदाला भेटून तो 'आजपासून आमी तुमचं. तुमी आमचं... काय वाटेल ते करा. आमी इचारनार न्हाई. अगदी पोराशपथ.' असं का सांगतो? गोविंदाची प्रतिक्रिया त्यावर काय होते? गोविंदा देवमामाला भेटून 'आमचं डोळं उघडलं.. आमी सरळ मनानंच वागू. तिच्याकडं कुनी नजर वर करून पाहिलं तर त्याचं डोळं काढून भिंतीला लावू' असं का सांगतो?

चांगदेवमामा गौराला पाहून तिच्या मोहात पडतो.

परंतु चांदवडीच्या भगवंतराव जाधवांचे स्थळ गौरासाठी येते तेव्हा चांगदेवमामा तिच्या भल्याचाच निर्णय घेतो. ''गेल्या चाळीस वर्षांची इठ्ठलाची सेवा काय वाया गेली न्हाई. राती इठ्ठलानं मला जागवलं. त्या भोवऱ्यातनं त्यानंच मला बाहीर काढलं. न्हाईतर पापाचा धनी झालो असतो मी! माझा इठ्ठल तुझं भलंच करंल.''

असा हा दीर भावजय संघर्ष, सरपंचाच्या मनातील हेलकावे, चांगदेव मामाच्या मनातील भोवरा यांचा गुंतागुंतीचा पट पांडुरंग कुंभार यांनी भोवरा या कथेत समोर पसरला आहे.

'धार' या दीर्घकथेतही इस्टेटीची, शेताची वाटणी हाच विषय आहे. मुंबईत नोकरी करून अधूनमधून पैसे पाठवणारा हनुमंत आपल्या शेतावर राबणाऱ्या यशवंत या भावावर वाटणीसाठी कोर्टात दावा लावतो. गावातले पंच जमवून वाटणीच्या वाटाघाटी होतात, परंतु त्या फिसकटतात. वकिलांची धन होत जाते. बदसल्ला देणारे आगीत तेल ओतत जातात. आणि यशवंता अखेर ठरवतो,'' आता ही कोर्टकचेरी बास झाली. राब राब राबायचं आणि इर्षेला पडून कुनाचं तरी फुकटात घर भरायचं. त्यापरीस खाल्लं तर त्योच खाऊ दे. किती केलं तरी भाऊच हाय त्यो.. या धारेतनं बाहीर पडाय पायजे. न्हाईतर या धारेबरोबर दोघंबी कुठं जाऊ ते समजायचं नाही. काठ हाताला लागायचा

नाही.'' आणि हे बोलून झाल्यावर त्याच्या मनावरचं ओझं उतरतं.

पांडुरंग कुंभार हे रणजित देसाई यांच्या मर्जीतले त्यांचे लेखनकार. रणजित देसाई यांच्या भावविश्वाशी समरस झालेले. लेखन शैलीशी घनिष्ठ परिचित असलेले. त्यांच्या कथा वाचताना, त्या कथांमधील सफाईदारपणा, नेमकेपणा, संभाषणे, वर्णने वाचताना, रणजित देसाई यांच्या लेखनाची आठवण होणे अपरिहार्य ठरते.

भोवरा आणि धार या दोन दीर्घकथांशिवाय अहिल्याबाई होळकर आणि शाहीर अनंत फंदी यांच्या भावबंधांची साक्षात्कार ही कथाही रेखीव आहे. श्रृंगारिक लावण्या म्हणणारा अनंत फंदी अहिल्याबाईंच्या सूचनेवरून धार्मिक कीर्तने करू लागतो. त्याची प्रक्रियाच या कथेद्वारे स्पष्ट करण्यात आली आहे.

शिवाजी राजांनी आपले पेशवे शामराज यांना पेशवे पदावरून तडकाफडकी दूर करण्याचा निर्णय घेतला– तो का हे 'वतन' कथेत येते.

'मानाचा तोडा' भैरोबाच्या यात्रेत विजेत्या पैलवानाला द्यायचा रिवाज. दादासाहेब भैरूला तोडा देतात; आणि त्याला वाड्यावर जेवायलाही आमंत्रित करतात. दादासाहेबांच्या न्यायबुद्धीचा हा आविष्कार त्यांच्या सरंजामी संस्कारांची थोरवी सिद्ध करणारा आहे.

खूप वर्षे मंत्रीपदाकडे आस लावून बसलेल्या आमदार जनार्दन पुंडलिक यांना अखेर आपली मंत्रीपदी वर्णी लागणार असे नक्की कळते. आपल्या गावकऱ्यांबरोबर ही बातमी ऐकण्यासाठी ते गावी येतात. रेडिओवर त्यांचे नावही नव्या मंत्र्यांच्या यादीत अग्रभागी येते. वर्षानुवर्षे, जी प्रतीक्षा केली तिला लाभलेले हे वास्तव फळ त्यांना सुखावते. ते लगेच मुंबईला निघतात. पहाटे मुंबईत आल्यावर वृत्तपत्रे घेऊन बातम्या वाचतात– आणि त्यांना कळते की मुख्यमंत्र्यांनीच राजीनामा दिलेला आहे.. 'साहेब काय सांगणार'मधील ही कलाटणी– सद्यःकालीन राजकीय क्षेत्रातील अनिश्चिततेवर मार्मिक प्रकाशझोत टाकते.

पांडुरंग कुंभार यांच्या कथांमध्ये जुन्या सरंजामी पारंपरिक मूल्यांची पूजा बांधण्यात येते, तशी दिलदार व्यक्तिमत्त्वे त्यांना आवडतात. त्या महापुरुषांच्या न्यायबुद्धीचे आणि औदार्याचे, कर्तव्यपालनांचे आणि महात्म्याचे गुणगान करण्यात ते रमतात. एकापुढे एक दृश्य नाटकातील प्रवेशाप्रमाणे उभे करून व्यक्तींना आमनेसामने उभे करण्यात त्यांना आनंद वाटतो. फापटपसारा टाळून, अर्थगर्भ संवादांद्वारे ते वातावरणातील ताणतणाव वाढवत जातात. शब्द मोजूनमापून वापरतात. त्यामुळे या कथा रेखीव आखीव होतात. रणजित देसाई असते तर त्यांनी आपल्या या चेल्यालाही सोन्याचा कडा बहाल केला असता.


**पृष्ठे १२४. ऐंशी रुपये. सवलत ६८/- सभासदांना ६०/- पोस्टेज १५/-**



## विज्ञान विशेष

विज्ञानक्षेत्रातील नवनव्या संशोधनातील नाट्य

**डॉ. बाळ फोंडके**




'लोकसत्ता'मध्ये विख्यात विज्ञानलेखक डॉ. बाळ फोंडके यांनी विज्ञानाशी निगडित अशा दैनंदिन समस्यांचे निराकरण करणारे एक सदर चालवले. बाबुराव यांना लिहिलेल्या पत्राचा आकृतिबंध स्वीकारल्यामुळे शास्त्रीय माहिती देतानाही ती रंजक शैलीत देणे सुलभ गेले. एरव्ही शास्त्रीय परिभाषा व तपशील सर्वसामान्य वाचकांच्या सहज पचनी पडत नाहीत. पत्ररूप अशा लेखनामुळे या सदराचे स्वरूप आटोपशीर आणि वाचनीय झाले आहे. आवश्यक तेवढी माहिती रमतगमत, अनौपचारिक ढंगात पेश केली गेली आहे.

डॉ. फोंडके हे विज्ञानक्षेत्रात होत असलेल्या नवनव्या संशोधनाची, प्रयोगांची आणि त्यातून समोर आलेल्या नव्या तथ्यांची आणि निष्कर्षांची साक्षेपाने नोंद घेणारे जागरूक अभ्यासक आहेत. विज्ञानाच्या एखाद्याच विशिष्ट शाखेतील अभ्यासात त्यांनी स्वतःला गुंतवून न ठेवता, वेगवेगळ्या शाखांमधील प्रगतीची नोंद घेण्याची सवय स्वतःला लावून घेतली आहे. विज्ञानविषयक मासिकाच्या संपादनाच्या अनुभवामुळे सर्वसमावेशक भूमिकेतून ते निरनिराळ्या शास्त्रशाखांमधील अद्ययावत संशोधनाची माहिती बारकाईने मिळवतात आणि ती मराठी वाचकांना सुबोध भाषेत सांगण्याचे काम व्रतस्थपणे करण्यात इतिकर्तव्यता मानतात. त्यांच्या चौफेर बहुश्रुतपणाने आणि आकलनाच्या आवाक्याने वाचक विस्मयचकित होतो. त्यांच्या लेखांतून मिळणाऱ्या बारीकसारीक तपशीलांमुळे आपल्या

ज्ञानात मोठी भर पडते. जगभर वेगवेगळ्या ज्ञानशाखांत चाललेल्या संशोधनाची दिशा कळते. आपल्या ध्यानीमनीही नसणाऱ्या प्रश्नांना जगभरचे शास्त्रज्ञ आपल्या बुद्धिकौशल्याने व तंत्रज्ञानाने सामोरे जाण्यासाठी अथक परिश्रम करीत आहेत याची कल्पना येते. आपल्या आजच्या भौतिक दृष्टीने समृद्ध जीवनाचा पाया घालणाऱ्या जगभरच्या संशोधकांच्या कार्याची महती कळतनकळत आपल्या मनावर बिंबत जाते.

भारतीय जादूगार व मांत्रिक यांची इंडियन रोप ट्रिक म्हणजे पाश्चात्त्य देशांमध्ये एक कुतूहलाचा विषय आहे. जादूगार पुंगी वाजवतो आणि इकडे एक दोरखंड नागाच्या फडेप्रमाणे वरवर ताठ उभा जात राहतो. त्यावर मुलगा चढून जातो आणि नंतर खाली उतरतो. शास्त्रज्ञांनी या जादूचा उलगडा करण्याचे ठरवले. अशी रोपट्रिक मी पाहिली आहे असे सांगणारे साक्षीदार १९ व्या शतकापासून ४८ निघाले. त्यांच्या नोंदीचा अभ्यास केल्यावर दिसले की त्यातील बहुतेक सांगोवांगीच्या गोष्टी आहेत. घटनेनंतर काही वर्षांच्या अवधीत केलेल्या नोंदी २१ उरल्या. ज्या नोंदी तीनचार वर्षांच्या कालावधीतील होत्या. त्यात ''दोरी ताठ उभी– मुलगा चढून वर गेला– मग खाली आला.'' असे वर्णन होते. घटनेनंतर बारा वर्षांनी नोंदविलेल्या वर्णनात 'मुलगा दोरीच्या वरच्या टोकावर गेला आणि काही क्षण गुप्त झाला.'' असे म्हटले होते. तीस वर्षांनंतरची जी नोंद होती तिच्यात ''दोरीवरून अदृश्य झालेला मुलगा प्रेक्षकांतून बाहेर आला'' असा उल्लेख होता. चाळीस वर्षे जुन्या आठवणीत मुलाचे तुकडे झाल्याचा उल्लेख होता.'' यावरून आठवणी जुन्या होत जाताना त्या मुरांबा मुरावा तशा अतिशयोक्तीने मुरत गेल्या हे स्पष्ट झाले. रोपट्रिक ही दंतकथाच ठरली. संख्याशास्त्राद्वारे आठवणींच्या वयाचं आणि प्रत्येक साक्षीदाराच्या नोंदीतील अद्‌भुतता यांचं नातं शोधण्यात आलं. त्या गणितानुसारही मानसशास्त्रज्ञांचा होरा योग्य ठरला. ''घटना जसजशी जुनी होते तसतशी तिच्याबद्दलची आपली आठवण धूसर होत जाते; पण ती आठवण ताजी आहे असे भासविण्यासाठी आपले मन कळतनकळत तिच्यात अधिक गहिरे रंग भरण्यासाठी कल्पित व सत्य यांचे बेमालूम मिश्रण करत राहते. इतके बेमालूम की सांगणाऱ्याचाही त्यावर विश्वास बसतो.''

अशाच प्रकारे बाळ फोंडके हे अनेक बाबींवर वैज्ञानिक संशोधनाच्या आधारे प्रकाशझोत टाकतात.

## भाषेशिवाय संवाद

भाषा ही दुसऱ्यांशी संवाद साधण्याचे काम करते. पण आपल्याला माहीत असलेली भाषा लोप पावली तर भाषेच्या अभावी संवाद साधता येईल की नाही? रॉबिन डनबार याने बबून जातीच्या वानरांच्या कळपाचे आफ्रिकेतील जंगलात जाऊन निरीक्षण केले. जोजो या वानरीने नव्या पिलाला जन्म दिल्यावर तिचे त्याच्याशी होणारे वर्तन त्याने चित्रित केले. त्यावरून त्याने त्यांच्यात भाषेशिवायही संवाद कसा साधला जातो



याबद्दल काही आडाखे बांधले.

## स्त्रियांचे सौंदर्य कशात आहे?

विश्वसुंदरी स्पर्धेच्या निमित्ताने डॉ. बाळ फोंडके यांनी सौंदर्याचे काही खास मोजमाप आहे का या प्रश्नाचा उलगडा केला आहे. सौंदर्य हे पाहणाऱ्याच्या नजरेवर अवलंबून असते असे मानले जाते; परंतु सौंदर्याच्या कल्पना प्रत्येक देशात, काळात व संस्कृतीत वेगवेगळ्या दिसतात. सौंदर्य दृष्टी हा माणसाच्या सामाजिक भावविश्वाचाच एक भाग मानायचा असे म्हटले तरी तिच्या पाठीशी काही मूलभूत जीवशास्त्रीय प्रेरणा असायला हवी, असे मत डोनाल्ड सायमन्स याने उत्क्रांतीच्या तत्त्वानुसार तर नॅन्सी एटकॉकने मानव वंशशास्त्राच्या निकषानुसार व्यक्त केले. त्यांनी निष्कर्ष काढला की, शरीराचा घाट आणि चेहऱ्याची ठेवण सर्वसाधारण असणं हेच सौंदर्याचं लक्षण. पेटेट, मे आणि योशिकावा या तिघांनी संगणकाच्या मदतीने सुंदर स्त्रियांच्या चेहऱ्यांची लक्षणे एकत्र करून एक वेगळेच चित्र तयार केले या चेहऱ्याची व सौंदर्य स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या चेहऱ्यांची तुलना करून, त्यातील जास्त सुंदर कोण असा प्रश्न अनेक व्यक्तींना विचारला. आश्चर्य हे की संगणकरचित युवतीचा चेहरा अनेकांनी निवडला.

पिरॅमिडचे बांधकाम इजिप्तमधील गिझा येथील खुफूच्या काळतील पिरॅमिडचं बांधकाम करायला किती मजूर लागले असतील? त्याची उंची १४७ मीटर, पायथ्याच्या चौरसाची बाजू २३० मीटर, घनफळ २६ लाख घनमीटर, वस्तुमान ७० लाख टन. खुफूची कारकीर्द एकूण २३ वर्षांची. हा तपशील लक्षात घेऊन रोज होणारे काम आणि एकूण कामाला लागलेला वेळ– याबाबतचा हिशेब करायला हवा. दररोज ३१० घनमीटर दगड बसले तरच हे काम २३ वर्षांत पूर्ण होणे शक्य होते. प्रत्येक मजूर दररोज किती काम करू शकतो? किती ऊर्जा खर्च करू शकतो? ह्या प्रश्नाचे उत्तर शरीरशास्त्रज्ञांनी शोधून काढलेले आहे. त्यावरून साडे नऊशे ते साडेबाराशे माणसे ह्या पिरॅमिडच्या कामात गुंतलेली असावीत असा हिशेब फोंडके मांडतात.

## चमकदार निळा रंग

माया संस्कृतीच्या सुवर्णकाळात उभारल्या गेलेल्या चर्चेत चिचेन इत्झा येथील भित्तिचित्रांचा तसेच मातीच्या भांड्यांचा निळा रंग अजूनही डोळे दिपवून टाकतो इतका ताजा तरतरीत आहे. ही संस्कृती किमान बाराशे वर्षे जुनी आहे. या रंगासाठी नीळ वापरली गेली आहे. पण तिचा रंग फिकट पडलेला नाही याचे गुपित काय? ते शोधून काढण्यासाठी मिग्वेल होजे याकामान या मेक्सिकन शास्त्रज्ञाने या भित्तिचित्रांची इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपने पहाणी केली. त्यातून त्याला काय जाणवले? मातीचा एक मजेदार गुणधर्म. मातीच्या बारीक बारीक सुया असतात, त्या निळीबरोबर मिसळल्यावर फुगतात; फुगल्यावर एकमेकांत मिसळतात व त्यांचं एक जाळं बनतं. त्या जाळ्यात

निळीच्या रंगाचे रेणू अडकून पडतात. काळाच्या हल्ल्यापासून ते रेणू सुरक्षित राहतात.

पुढचा प्रश्न असा की निळीची चमक कशामुळे वाढत जाते? एक उत्तर– मातीतील लोहामुळे. पण लोह लाल असतो. त्यावर अधिक संशोधनासाठी नॅनोटेक्नॉलॉजीचा वापर करण्यात आला. तेव्हा असे लक्षात आले की एरव्ही आपली लाली शाबूत ठेवणाऱ्या लोहाचे अतिसूक्ष्म कण निळा रंग पसंत करतात. एवढ्यावर समाधान न मानता समकालीन युरोपमधील चित्रांतील निळ्या रंगाचा त्याने नैसर्गिक अभ्यास केला. त्या चित्रातील रंगात काही लोहधातूचे कण नव्हते. मेरिडा येथील एका खाणीतील पांढरी माती व निळीचा रंग यांचे मिश्रण केल्यावर मात्र त्याला माया ब्ल्यूच्या तोडीस तोड रंग मिळाला. याकामानच्या या संशोधन क्षेत्रातील चिकाटीचे कौतुक वाटणे साहजिक आहे.

### मृत समुद्रात जगणारे सूक्ष्म जीव

मृत समुद्रात कोणताही प्राणी जगत नाही. परंतु तीन इस्रायली संशोधकांनी मृत समुद्रातही काही सूक्ष्म जीव (हॅलो आर्क्युला मॅरिस्मॉर्नुई) कसे जगतात याचा शोध घेतला. त्यासाठी फेरेडॉक्सिन या प्रथिनाचे विशेष गुणधर्म शोधून काढले. फेरेडॉक्सिन आपल्या अंगाची अशी काही माटेकुळी करतो की त्यामुळे ऋण विद्युतभार बाह्य पृष्ठभागाकडे ढकलला जातो व पाण्याचे रेणू खेचून घेतो. जगण्यासाठी प्रथिनाला पाण्याचे संरक्षक कवच मिळते. त्याशिवाय मृत समुद्रातील जीवाणूंमधील फेरेडॉक्सिन स्वतःच्या अंगी एक शेपूट चिकटवून घेते, त्यावरही मूळ अंगापेक्षा अधिक मात्रेत ऋण विद्युतभार असतो. म्हणूनच अत्यंत बिकट परिस्थितीतही हे जीवाणू जगू शकतात.

अशा कितीतरी बाबींवर डॉ. बाळ फोंडके यांनी प्रकाश टाकला आहे. नव्या सहस्रकात जगणाऱ्यांना या नवनव्या संकल्पनांचे ज्ञान असणे ही जीवनावश्यक बाब ठरणार आहे.

रंगसूत्रे, ज्युरॅसिक पार्क, मुलगा की मुलगी, स्मृती म्हणजे काय, उपग्रहाद्वारे होणारे अंतरिक्षज्ञान, जुन्या चित्रांचा काळ ठरवण्याच्या पद्धती, शरीरगंध, फुलांचं आयुष्य, केळीमधील पचन विरोधी पिष्टमय घटकांचे आरोग्यवर्दक कार्य, मुंग्यांमधील उत्क्रांती व बहुस्त्री प्रणालीचा पुरस्कार, मुंगसावर सर्पविषाचा परिणाम का होत नाही, वानर टोळ्यांमधील नेतृत्वाची स्पर्धा, वार्धक्यातील आत्मविश्वास व आरोग्य यांचे रहस्य, कोलेस्टेरॉलची जेकिल व हाइड यासारखी दोन रूपे, डावखोरेपणाचे कारण, प्राण्यांच्या थव्यांच्या उड्डाणप्रणालीतील विविधता, आवाजातील अधिकारपदाचा दर्प, कुलवृत्तांत व उत्क्रांतीचा वेग यांचा संबंध– अशा अनेक दैनंदिन बाबींवरही जे संशोधन जगभर चालू आहे त्याची झलक वाचकांना या लेखनाद्वारे विनासायास पहायला मिळते.

**पृष्ठे १८४, एकशे दहा रुपये.**
**सवलतीत ९४ रु. सभासदांना ८२ रु. पोस्टेज १५ रु.**



धनंजय

## किचकट कायद्यांचा सुबोध परिचय

# व्यवसायविषयक कायदे

**डॉ. जे. एस. चौधरी**

भारतीय करार कायदा, माल विक्री कायदा, भारतीय भागीदारी कायदा, चलनक्षम पत्रकांचा कायदा (दि निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् ॲक्ट), भारतीय कंपन्यांचा कायदा, ग्राहक संरक्षण कायदा आणि औद्योगिक कलह कायदा अशा व्यावसायिक क्षेत्रातील सात महत्त्वाच्या कायद्यांची रूपरेखा स्पष्ट करणारे हे पुस्तक वाईच्या किसनवीर महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. जे. एस. चौधरी यांनी तयार केले आहे. वाणिज्यविषयक अभ्यासक्रमात या कायद्यांचा समावेश केला गेला आहे, त्यामुळे मुख्यतः पदवीसाठी अभ्यास करणाऱ्यांसाठी हे पुस्तक लिहिण्यात आले आहे तरीही सर्वसामान्य नागरिकांनाही या सर्व कायद्यांची माहिती असणे लाभदायक ठरते. दैनंदिन जीवनात आपण अनेकांशी अनेक प्रकारचे व्यवहार करीत असतो, वस्तू विकत घेतो, विकतो, काही कारारमदार करतो, देण्याघेण्याचे निर्णय घेतो. त्यात काहीही गफलत, गैरसमज झाला वा संबंधित व्यक्तीने काही घोळ घातला तर त्याबाबतचा वाद सोडविण्यासाठी न्यायालयाकडे धाव घेणे भाग पडते. न्यायालय या विशिष्ट कायद्याच्या आधारे निर्णय देते. कायद्याची परिभाषा क्लिष्ट असते. आणि त्यामधील निरनिराळ्या तरतुदींचा बारकाईने विचार करावा लागतो. इंग्लिशमधील मूळ संहितांचे मराठीकरण करणे अजूनही अवघड ठरते.



त्यामुळेच मराठीत या सर्व कायद्यांची ओळख करून देण्याचा डॉ. जे. एस. चौधरी यांचा हा प्रयत्न महत्त्वाचा ठरतो.

हॉटेलमध्ये चहा घेणे, बसने प्रवास करणे, सिनेमाला जाणे, कुठलीही वस्तू खरेदी करणे हे व्यवहार देखील करार कायद्यात येतात, याची आपल्याला कल्पना असते का?

करारामुळे व्यक्तीचे कायदेशीर हक्क व जबाबदाऱ्या निर्माण होतात. हॉटेलात गेल्यावर चहाची ऑर्डर दिल्यावर विशिष्ट प्रतीचा विशिष्ट प्रमाणातील चहाचा कप समोर यायला हवा. त्यात काही गडबड असल्यास तो व्यवहारही न्यायालयीन कक्षेत येऊ शकेल. परंतु अशा लहानसहान बाबतीत सहसा आपण कोर्टकचेऱ्यांच्या व्यापात पडत नाही, मालविक्रीच्या करारात काही शर्ती स्पष्ट नमूद करण्यात येतात पण अनेक शर्ती गृहीत धरलेल्या असतात. (उदा. शांततापूर्व ताबा देण्याचे आश्वासन, बोजारहित मालासंबंधी आश्वासन, मालाच्या सुरक्षिततेसंबंधी आश्वासन)

१९८६ च्या ग्राहक संरक्षण कायद्यानुसार ग्राहकाचे हक्क ठरवण्यात आले आहेत. जागतिक ग्राहक संघटनेनेच ते निश्चित केले आहेत. (१९६२ साली)

(१) सुरक्षिततेचा हक्क, (२) माहिती मिळविण्याचा हक्क (३) वस्तू निवडीचा हक्क (४) गाऱ्हाणे मांडण्याचा हक्क (५) दाद मागण्याचा हक्क (६) आरोग्यदायी वातावरणाचा हक्क (७) मूलभूत गरजांचा हक्क.

या कायद्यात प्रारंभी ग्राहक, उचित प्रयोगशाळा, तक्रार कर्ता, तक्रार, व्यक्ती, दोष, उणीव किंवा त्रुटी, उत्पादक, सेवा, अनुचित व्यापारी प्रथा या सर्वांच्या व्याख्या देण्यात आल्या आहेत. ग्राहक तक्रार निवारण यंत्रणा त्रिस्तरीय असून जिल्हा न्यायमंच, राज्य आयोग आणि राष्ट्रीय आयोग अशी तिची रचना आहे. ग्राहक मंचाच्या आदेशाची अंमलबजावणी दिवाणी न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणेच व्हावी असे गृहीत धरलेले आहे. ग्राहकमंचाकडे अतिकिरकोळ किंवा दुष्ट हेतूने प्रेरित होऊन तक्रार केल्याचे लक्षात आले तर तक्रारकर्त्याला दहा हजार रुपयांपर्यंत दंड करण्याची तरतूदही आहे, आणि ग्राहकमंचाच्या आदेशाचे पालन न केले तर संबंधित व्यक्तीला किंवा संस्थेला एक महिना ते तीन वर्षे कैद आणि दोन ते दहा हजार रुपयांचा दंड अशा शिक्षांच्या तरतुदी आहेत.

कायद्यांमधील तरतुदी अत्यंत गुंतागुंतीच्या असतात. या पुस्तकामुळे अनेक बाबींचा सहजपणे उलगडा होऊ शकेल.

**पृष्ठे १९४, शंभर रुपये.**

**सवलतीत ८५ रु., सभासदांना ७५ रु. पोस्टेज १५ रु.**

## फुले आणि काटे

### असं असतं ग्रंथप्रेम

लोकनायक माधव श्रीहरी अणे यांचे नाव आजच्या पिढीला फारसे ठाऊक नाही. लोकनायक अणे साऱ्या महाराष्ट्राला परिचित होते ते बापूजी अणे या नावाने. आपल्या कार्यकर्तृत्वाचा आगळावेगळा ठसा उमटविणारे म्हणून बापूजी अणे यांचा अभिमानाने उल्लेख केला जातो. संस्कृतवर त्यांचं विलक्षण प्रेम. लोकमान्य टिळकांचे त्यांनी संस्कृतमध्ये तीन खंडांत चरित्र लिहिले.

उत्तमोत्तम ग्रंथांचा संग्रह करण्याचा त्यांना नाद होता. त्यांच्या संग्रहात संस्कृत, इंग्रजी, हिंदी, मराठी भाषेतील असंख्य मौल्यवान ग्रंथ होते आणि या ग्रंथांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य जर कोणते असेल तर त्या ग्रंथांचे बापूजींनी किती सखोल वाचन केले त्याच्या खुणा ग्रंथात जागोजागी खुणा दिसतात.

ते काही काल सिलोनचे हायकमिशनर होते. या व्यापाबरोबरच इतर सार्वजनिक कामांचे व्यापही त्यांनी मागे लावून घेतले असल्यामुळे त्यांची यवतमाळ, दिल्ली, कोलंबो, पाटणा, नागपूर अशी सारखी भ्रमंती सुरू असायची. साहजिकच ग्रंथसंग्रहाची जेवढी काळजी घ्यायला हवी होती तेवढी घेतली गेली नाही.

पुढे बापूजी अणे सेवानिवृत्त झाले आणि या ग्रंथांचे पोरकेपण वाढले. शेवटी शेवटी हे ग्रंथ नागपूर येथे केविलवाणे होऊन पडले होते. या ग्रंथांच्या ओढीने बापूजी हा ग्रंथसंग्रह पाहण्यासाठी गेले. ज्या ग्रंथांनी त्यांच्या मनाला उभारी दिली, बुद्धी सतेज केली त्या ग्रंथांची अवस्था पाहून ते दुःखी झाले.

पुढे आपला हा ग्रंथसंग्रह वणीच्या लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्राचार्य राम शेवाळकर यांच्या स्वाधीन करताना बापूजी अणे म्हणाले, ''माझे आई-वडील गेले तरीही मला रडू आले नाही, परंतु माझ्या या ग्रंथांची अशी अवस्था पाहिली आणि...''

बापूजींना पुढे बोलवेना. त्यांचे डोळे भरून आले. आपला हा ग्रंथसंग्रह आत्मीयतेने, प्रेमाने स्वीकारल्याबद्दल प्राचार्य राम शेवाळकर यांचे बापूजींनी आभार मानले. असे हे बापूजी अणे यांचे ग्रंथप्रेम.

**—राम देशपांडे**




मुदत ३१ डिसेंबर ९९ पर्यंतच !

**उत्तमोत्तम पुस्तकांचे आकर्षक संच**
**भरपूर सवलत ! किंवा दर्जेदार पुस्तक भेट !**

**भेट !**
अभोगी - १२०रु.
झिमझिम- ५५रु.

**उत्कृष्ट कादंबऱ्या**

| | | |
|---|---|---|
| समिधा | रणजित देसाई | ८०रु. |
| बारी | रणजित देसाई | १००रु. |
| एडविना आणि नेहरू | अनु. वि.स.वाळिंबे | २५०रु. |
| नियती | माधवी देसाई | ६०रु. |
| मूल | संजोग वीरकर | ९०रु. |

५८० रुपयांचा हा संच ४३५ रुपयात मिळवा. किंवा ५८०रु. भरा व १७५रु.ची भेट पुस्तके मिळवा. म्हणजे संचातील पुस्तके फक्त ४०५रुपयात ! + पोस्टेज २०रु.

योजना ३१ डिसेंबर ९९ पर्यंत चालू राहील.

**दिवाळीनिमित्त खास दीपावली योजना**

सप्टेंबर महिन्यापासून तीन महिन्यात **१०००** रुपये भरा व दिवाळीच्या सुट्टीत **१५००** रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके मिळवा. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व दीपावलीचा आनंद द्विगुणीत करा. सभासद होण्यासाठी आपल्या नाव व पत्त्यासह आपला पहिला हप्ता मनीऑर्डर अथवा ड्राफ्टद्वारे त्वरीत पाठवा.

■ या योजनेत स्वामी, श्रीमानयोगी व रुचिरा भाग १ व २ ही पुस्तके मिळणार नाहीत.


**आमचा पत्ता :** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०

# कॅ. वासुदेव बेलवलकर *लिखित ऐतिहासिक कादंबरी*

**रणधुमाळीत वार लागून घोड्यावरून कोसळलेल्या रणझुंजार दत्ताजीराव शिंद्यांच्या गळ्यावर धारदार समशेरीचे तळपते पाते ठेऊन कुत्बशहाने छद्मीपणाने पुसले–**

**''क्यों, दत्ताजी पटेल, हमारे साथ लढेंगे?''**

**''बचेंगे तो और भी लढेंगें''–**



# नवरत्ने हरपली रणांगणी

**मूल्य : ४००/-**

**सवलत मूल्य : ३००/-**

---

**पहिल्या बाजीरावांच्या उत्तुंग यशाची काळजाला हात घालणारी ऐतिहासिक कादंबरी**

# घटकेत रोविले झेंडे

**पहिला बाजीराव! या निधड्या पेशव्याला अपयश माहीतच नव्हतं, त्याचं कर्तृत्व, शौर्य, दूरदर्शीपणा सारं काही अफाटच होतं. या कर्तव्यकठोरपणा-बरोबरच बाजीराव-मस्तानीच्या नाजूक भावबंधाचीही ही कहाणी! दुर्दैव एवढंच, आप्तस्वकीयांच्या विरोधामुळं या महापुरुषाच्या जीवनाची अकाली इतिश्री झाली– त्याची ही गाथा! इतिहासावर प्रेम करणाऱ्या कॅ. वासुदेव बेलवलकरांच्या लेखणीतून रसाळपणे उतरलेली!**




■ **मूल्य रु. ६००/-**

प्रमोद प्रकाशन
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.
✆ : ४४७८९९६.



---

## स्पंदन : एका मतिमंद मुलाच्या आईचं,




**कुणाचं?** : माझं..

**कशाचं?** : ईश्वराला साक्षी ठेऊन केलेल्या निरीक्षणांचं, संवेदनांचं, विचारांचं, चिंतनाचं, प्रयोगांचं...

**कोणाविषयीचं?** : खोलवर जाणवलेल्या–भावलेल्या क्षणांचं... **पण ते सांगावसं वाटतं,** कारण ते फक्त माझं एकटीचं नाही म्हणून...


**का वाटलं?** : जे आहे त्याला मनात गप्प बसवत नाही म्हणून... ते उकलून, उमलून, उचसळून, ओसंडून बाहेर येतं म्हणून... जे बाहेर येतंय ते आपल्यासारख्या संवेदनशील करुणामयी सुहृदांमध्ये सांगावसं वाटलं म्हणून...

**लेखिका : डॉ. ऋजुता विनोद**

□ **मूल्य :** रु. १८०/- □ **सवलत मूल्य :** रु. १२०/-

---

## धवल-गिरी




- प्रकांड पंडित, तत्वज्ञ, योगी, संत, ब्रह्मलीन महर्षी न्यायरत्न विनोद यांचा एक अलौकिक ग्रंथ.
- अध्यात्मसाधनेसाठी सर्वार्थाने उपयुक्त ठरलेला ग्रंथ.
- रूपकात्मक पद्धतीने केलेली कथारूप मांडणी
- अध्यात्मातील संकल्पनांचे हळुवारपणे व समर्थपणे उलगडत जाणारे पैलू.
- आयुष्यात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारी 'ध्यानबीजे'.
- साधनेची खोली व उंची वाढवणारा साध्या, सोप्या भाषेतील अपूर्व ग्रंथ.

**लेखक : महर्षी न्यायरत्न धुं. गो. विनोद**

**मूल्य :** रु. २००/- **सवलत मूल्य :** रु.१४०/-

---



परदेश प्रवासातील
## योगचिंतन

**लेखक :** डॉ. संप्रसाद विनोद

हे पुस्तक म्हणजे नुसते प्रवासवर्णनच नव्हे, तर ते आहे एक प्रकट चिंतन– एका सुप्रसिद्ध, उच्चविद्या विभूषित आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या योग्याचे!

परदेश प्रवास करीत असताना त्यांना आलेल्या विविध प्रकारच्या अनुभवांचे!

भेटलेल्या व्यक्ती व पाहिलेल्या घटनांद्वारे घडलेल्या एका आंतर्यात्रेचे!

जीवनविषयक समस्यांचे, त्यावरील समर्पक उत्तरांचे आणि तेही सर्वांना समजेल अशा भाषेतले!

**मूल्य :** रु. १२०/- **सवलत मूल्य :** रु. ८०/-

प्रमोद प्रकाशन

**१०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.**
**फोन : ४४७८९९६**

## वाचकांचा प्रतिसाद

जुलै ९९ च्या संपादकीयात आपण इंडिया टुडे बुक क्लबचा उल्लेख केला आहे. आपण पुढाकार घेऊन अशी योजना मराठीत चालू करावी. अमेरिकन एक्स्प्रेस, व्हिसा, सिटीबँक कार्ड अशा क्रेडिट कार्डद्वारे पुस्तके घेता येतील. आपले मासिक वाचल्यावर पुस्तके विकत घेण्याची इच्छा होते. इंडिया टुडे बुक क्लबची पुस्तके इंग्रजी माध्यमात शिकलेली माझी मुले दरमहा मागवतात. परंतु आमच्या घरातला मराठी वाचक ऐपत असूनही ग्रंथ विकत घेऊन वाचू शकत नाही. मनीऑर्डर किंवा बँकड्राफ्ट यासाठी मुंबईतल्या माणसाला वेळ नसतो. माझ्यासारखे अनेक वाचक असतील. शक्यतो ही क्रेडिटकार्ड योजना चालू करावी. प्लास्टिकचे धन आज असंख्य मराठी वाचकांकडे आहे याची मला खात्री आहे.

**– यतीश वासुदेव, गावदेवी, मुंबई ७**

मेहता मराठी ग्रंथजगतचा मी नुकताच सभासद झालो. अंक नुसताच सुंदर नसून अत्यंत वाचनीय आहे.

'पुस्तक परिचय' या सदरामध्ये आपण अत्यंत मोजक्या, चांगल्या शब्दांत पुस्तकांची अशी परिणामकारक ओळख करून देता की कधी एकदा ते पुस्तक आणून वाचतो असं होतं. साहित्यातील ताज्या घडामोडींविषयी बातम्या 'साहित्यवार्ता' या सदरामध्ये वाचायला मिळतात. संपादकीय, शब्दकोडे इ. सदरे उपयुक्त आहेत.

भारतातील तसेच जगातील नामवंत साहित्यिकांचे सुंदर विचार 'फुले आणि काटे' या सदरात वाचायला मिळतात. सर्वात सुंदर असं हे सदर आहे. अनिल मेहतांच्या मुलाखतीतून अमेरिकेतील मराठी पुस्तकांच्या 'मार्केट'बद्दल तसेच तिथल्या अडचणींबद्दल माहिती मिळाली.

थोडक्यात, एक अत्यंत माहितीपूर्ण वाचनीय, सुंदर 'पुस्तक' वाचल्याचे समाधान आपल्या अंकाद्वारे मिळते.

**– किशोर नलावडे,जेऊर, पुणे.**